मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल
बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२


# मालमत्ताकरातून पालिकेच्या तिजोरीत 949 कोटींचा भरणा

## गेल्या वर्षीच्या तुलनेत आकडेवारी कमी : मार्चमध्ये तब्बल 164 कोटी रुपयांपर्यंत वसुली

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या करसंकलन विभागाच्या वतीने सन 2024-25 या आर्थिक वर्षात सोमवारपर्यंत (दि. 31) 949 कोटी रुपयांचा भरणा महापालिका तिजोरीत झाला आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत ही आकडेवारी कमी आहे.

मार्च महिन्यात 164 कोटींची वसुली

करसंकलन विभागाला सन 2024-25 या आर्थिक वर्षात 1 हजार कोटी रुपये वसुलीचे उद्दिष्ट होते. विभागाकडून मार्च महिन्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत 949 कोटी रुपये वसूल करण्यात आले आहे. गेल्या सन 2023-24 या आर्थिक वर्षात एकूण 977 कोटी 25 लाख रुपयांची वसुली करण्यात आली होती. एक हजार कोटी रुपयांचे उद्दिष्ट गाठण्यासाठी या विभागाने कारवाई मोहीम तीव-केली होती. थकबाकीदारांच्या मालमत्ता सील करून जप्त करण्यात आल्या होत्या.

तसेच, नळजोड तोडण्यात आले. वृत्तपत्रात थकबाकीदारांची नावे प्रसिद्ध करण्यात आली. जनजागृती मोहीम राबविण्यात आली. थकबाकीदारांना फोन व एसएमएस करून बिल भरण्याबाबत सूचना करण्यात आल्या होत्या. शेवटच्या टप्प्यात कारवाई मोहीम तीव-केल्याने थकबाकी भरण्यास मालमत्ताधारकांनी प्रतिसाद दिला आहे. शेवटच्या मार्च महिन्यात तब्बल 164 कोटी रुपयांपर्यंत वसुली झाली आहे.

करसंकलन विभागाने सोमवारी सायंकाळी सातपर्यंत एकूण 949 कोटींची वसुली केली होती. अखेरच्या दिवशी रात्री बारापर्यंत भरणा स्वीकारण्यात येणार आहे. त्यामुळे या वसुलीत आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.



> सोमवारी (दि. 31) सायंकाळी सातपर्यंत 949 कोटी रुपयांचा मालमत्ताकर जमा झाला आहे. मार्चच्या एका महिन्यात एकूण 164 कोटी रुपये जमा झाले आहेत. सोमवारी रात्रीपर्यंत 12 मुदत असल्याने वसुल रक्कमेत आणखी वाढ होईल.
>
> **- अविनाश शिंदे, सहायक आयुक्त, करसंकलन विभाग.**

# पिंपरी-चिंचवडमधील चार दारु दुकानांची 'बाटली आडवी'

## आमदार महेश लांडगे यांच्या लक्षवेधीनंतर प्रशासनाचा 'ॲक्शन मोड'

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवडमधील रहिवाशी क्षेत्रात किंवा सोसायटी परिसरात दारुच्या दुकांनामुळे होणाऱ्या त्रासाविरोधात आमदार महेश लांडगे यांनी नुकत्याच झालेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये आवाज उठवला होता. दारु दुकांनदारांच्या मनमानीबाबत नियमांची कठोर अंमलबजावणी व्हावी आणि नियमबाह्य काम करणाऱ्या दारु दुकानदारांवर कारवाई करावी, अशी मागणी केली होती. त्यामुळे हा मुद्दा महाराष्ट्रभरात चर्चेत आला. त्याला सर्वपक्षीय आमदारांसह उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही सकारात्मक उत्तर दिले होते. अखेर त्याचा 'रिझल्ट' दिसू लागला आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दारु दुकांनांच्या नियमावलीची काटेकोर अंमलबजावणी केली जाईल, असे निर्देश सभागृहात दिले. त्यानंतर आमदार महेश लांडगे यांनी संबंधित विषयाला अनुसरुन भोसरीसह पिंपरी-चिंचवड शहरातील नियमबाह्यपणे दारु विक्री व्यावसाय करीत आहेत. ज्यांच्यामुळे रहिवाशी क्षेत्रात नाहक उपद्रव होत आहे. अशा दुकानदारांबाबत चिखली-मोशी-चऱ्होली- पिंपरी-चिंचवड सोसायटी फेडरेशन आणि आमदार लांडगे यांनी राज्य उत्पादन शुल्क विभागाकडे तक्रार दाखल आहेत. त्यावर तात्काळ कारवाई करण्याची मागणी केली होती.

दरम्यान, राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी नियमबाह्यपणे दारु विक्री आणि नियमांचे उल्लंघटन केल्याबाबत भोसरी विधानसभा मतदार संघातील चिखली व मोशी या भागात श्रीमती उषा चौधरी देशी दारु दुकान, मे. एम. डी. के. बिअर शॉपी, मे. गोल्डन बिअर शॉपी आणि लकी बिअर शॉपी यांच्याबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी यांना पाठवला होता. त्यावर जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी सदर दुकानांचा परवाना कायमस्वरुपी रद्द करण्याची कारवाई केली आहे.

दारु विक्रेत्यांमध्ये खळबळ...

रहिवाशी क्षेत्रातील दारु दुकानदारांच्या मनमानीमुळे सामान्य नागरिकांना होणारा त्रास याबाबत आमदार महेश लांडगे यांनी विधानसभा सभागृहात आवाज उठवला. त्यावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सकारात्मक उत्तर दिले. तसेच, सर्वपक्षीय आमदारांनीही या मुद्याला पाठिंबा दिला. त्यानंतर तात्काळ जिल्हा प्रशासनाने भोसरी मतदार संघात तपासणी केली. नियमबाह्य व्यावसाय करणाऱ्या चार दुकांनाचा परवाना कायमस्वरुपी रद्द झाला. परिणामी, चुकीचे काम केल्यास कारवाई अटळ आहे, असा संदेश दारु विक्रेते दुकानदारांमध्ये गेला आहे. त्यामुळे मद्य विक्री व्यावसायिकांच्या वर्तुळात खळबळ उडाली आहे.



> रहिवाशी आणि सोसायटींच्या आवारात असलेल्या दारु विक्री दुकानांच्या नियमबाह्य कृतींमुळे सामान्य नागरिकांना त्रास होतो आहे. याबाबत सोसायटीधारकांच्या मागणीनुसार प्रशासनाकडे तक्रार केली होती. मात्र, त्याकडे दुर्लक्ष होत होते. त्यामुळे अर्थसंकल्पीय अधिवेशनात राज्य सरकारचे लक्ष वेधले होते. त्यावेळी सरकारने कार्यवाहीचे आश्वासन दिले होते. त्यानंतर आम्ही पुन्हा जिल्हाधिकारी कार्यालय आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाकडे कारवाईसाठी पाठपुरावा केला. यावर आम्ही केलेल्या तक्रारींमधील 4 दुकानांचा परवाना कायमस्वरुपी रद्द करण्याची कारवाईची कारवाई करण्यात आली. ज्याप्रमाणे पिंपरी-चिंचवडमध्ये कारवाई केली, तसेच नागरी वस्ती उपद्रव होईल, अशी दुकाने बंद करण्याबाबत महाराष्ट्रभरात प्रशासनाने कारवाई करावी, अशी मागणी राज्य सरकारकडे आहे.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भोसरी, विधानसभा, भाजपा.**

# संपूर्ण शहराचा पाणीपुरवठा गुरुवारी बंद

## उन्हाळ्यापूर्वी जलवाहिन्यांची तातडीची देखभाल दुरुस्तीची कामे सुरू

**पुणे | प्रतिनिधी**

उन्हाळ्यापूर्वी जलवाहिन्यांची तातडीची देखभाल दुरुस्तीची कामे येत्या गुरुवारी (३ एप्रिल) महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून करण्यात येणार आहेत. त्यामुळे गुरुवारी संपूर्ण शहराचा पाणीपुरवठा बंद राहणार असून दुसऱ्या दिवशी म्हणजे शुक्रवारी (४ एप्रिल) सकाळी उशिरा आणि कमी दाबाने पाणीपुरवठा होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.



जुने आणि नवीन पर्वती जलशुद्धीकरण केंद्र, भामा आसखेड, लष्कर जलकेंद्र, होळकर जलकेंद्र, वडगाव जलकेंद्र, राजीव गांधी पंपिंग, खडकवासला जॅकवेल, वारजे जलकेंद्र, एसएनडीटी, चांदणी चौक, गांधीभवन टाकी, पॅनकार्ड क्लब, वारजे जलकेंद्र, चतु:श्रृंगी जलकेंद्र, कोंढवे-धावडे जलकेंद्र यांच्यासह अन्य जलकेंद्रातील जलवाहिन्यांमध्ये ही कामे करण्यात येणार आहेत, अशी माहिती पाणीपुरवठा विभागाकडून देण्यात आली.

मध्यवर्ती भागातील सर्व पेठा, क्वार्टरगेट परिसर, गंजपेठ, गुरुवार पेठ, भवानी पेठ, नाना पेठ, लोहिया नगर, दत्तवाडी परिसर, राजेंद्रनगर, लोकमान्यनगर, डेक्कन परिसर, शिवाजी नगर, स्वारगेट, सहकारनगर, पद्मावती, बिबवेवाडी, मुकुंदनगर, महर्षीनगर, गंगाधाम, चिंतामणीनगर १ आणि २, लेक टाऊन परिसर, अप्पर इंदिरानगर, लोअर इंदिरानगर, बिबवेवाडी गावठाण, डायस प्लॉट, ढोले मळा परिसर, सॅलेसबरी पार्क, गिरीधर भवन चौक परिसर, पर्वती गावठाण, मीठानगर, शिवनेरी नगर, भाग्योदयनगर, कोंढवा खुर्द, पर्वती दर्शन, तळजाई, कात्रज, धनकवडी परिसर, हडपसर, सातववाडी, गोंधळेनगर, ससाणेनगर, काळे पडळ, बीटी कवडे रस्ता, भीमनगर, रामटेकडी, औद्योगिक परिसर, वानवडी, पुणे कॅन्टोन्मेंट परिसर, केशवनगर, साडेसतरा नळी, फुरसुंगी, उरूळी देवाची, मांजरी बुद्रुक, शेवाळवाडी, खराडी, वडगांवशेरी, ताडीवाला रस्ता, मंगळवार पेठ, मालधक्का, येरवडा, रेसकोर्स, मुळा रस्ता, खडकी, हरीगंगा सोसायटी, लोहगांव, विमाननगर, वडगांवशेरी, कल्याणीनगर, विश्रांतवाडी, फुलेनगर, येरवडा, कळस, धानोरी, पाषाण, भूगाव रस्ता, बावधन, उजवी आणि डावी भुसारी कॉलनी, गुरूगणेशनगर, चिंतामणी सोसायटी, पूजा पार्क, सारथी शिल्प सोसायटी, डुक्कर खिंड परिसर, शास्त्रीनगर, न्यू लक्ष्मीनगर, परमंहसनगर, पाषाण, सोमेश्वरवाडी, सुतारवाडी, निम्हणमळा, लम्हाणतांडा, सूस रस्ता, रेणूकानगर, पॉप्युलर नगर, वारजे माळवाडी, गोकुळनगर, अतुलनगर, महात्मा सोसायटी, एकलव्य महाविद्यालय परिसर, धनंजय सोसायटी, कोथरूड क्षेत्रीय कार्यालय परिसर, श्रावणधारा झोपडपट्टी, सहजानंद, लक्ष्मीनगर झोपडपट्टी परिसर, हिंगणे होम कॉलनी, कर्वेनगर, कर्वेनगर गावठाण, तपोधान परिसर, रामनगर, कालवा रस्ता, बाणेर, बालेवाडी, पॅनकार्ड क्लब रस्ता, विजनगर, दत्तनगर, कर्वेनगर, वारजे जकात नाका परिसर, कर्वेनगर गल्ली क्रमांक एक ते दहा, गोखलेनगर, औंध, बोपोडी, विद्यापीठ परिसर, विधी महाविद्यालय रस्ता, बीएमसीसी, आयसीएस कॉलनी, भोसलेनगर, सेनापती बापट रस्ता, भांडारकर रस्ता, प्रभात रस्ता, दशभूजा गणपती परिसर, नळस्टॉप, वकीलनगर, करिष्मा सोसायटी, शिवाजीनगर, गोखलेनगर, मॉडेल कॉलनी परिसर, रेव्हेन्यू कॉलनी, कोथरूड, वडारवाडी, श्रमिक वसाहत, डहाणूकर कॉलनी, सुतारदरा, किष्किंदानगर, जयभवानीनगर, केळेवाडी, आयडीयल कॉलनी, जनवाडी, वैदूवाडी, संगमवाडी, हिंगणे, आनंदनगर, वडगांव, धायरी, आंबेगाव पठार, दत्तनगर, भारती विद्यापीठ परिसर, कोंढवा बुद्रुक, आंबेगाव, येवलेवाडी या भागाचा पाणीपुरवठा गुरुवारी बंद राहणार आहे.

# गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर 28 टक्क्यांनी वाहने वाढली

## गुढी पाडवा सणाच्या मुहूर्तावर पुणे शहरात तब्बल 10 हजार 170 वाहनांची खरेदी

**पुणे | प्रतिनिधी**

साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेल्या गुढी पाडवा सणाच्या मुहूर्तावर पुणे शहरात तब्बल १० हजार १७० वाहनांची खरेदी झाली. यामध्ये सर्वाधिक सहा हजार ५१० दुचाकी, तर दोन हजार ४२४ चारचाकी वाहनांचा समावेश आहे. विशेष म्हणजे नवीन वाहन खरेदीकडे गेल्या वर्षाच्या तुलनेत यंदा तब्बल अडीच हजारांहून अधिक (२८ टक्के) वाढ पुणे शहर उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाने (आरटीओ) नोंदवली. गेल्या वर्षी (२०२४ ) गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर सात हजार ३३६ वाहनांची नोंदणी झाली होती, तर २०२३ मध्ये, पाडव्याच्या मुहूर्तावर सात हजार ७०६ वाहनांची नोंदणी झाली.



> पुणेकरांचा दुचाकी वाहनांसाठी सर्वाधिक कल आहे. गेल्या वर्षाच्या तुलनेत यंदा दोन हजार २२९ दुचाकी जास्त खरेदी करण्यात आल्या आहेत. २०२४ मध्ये पाडव्याला चार हजार २२१ दुचाकी खरेदी करण्यात आल्या होत्या, तर यंदा सहा हजार ५१० दुचाकी खरेदी करण्यात आली आहे. त्या पाठोपाठ चारचाकी आणि मालवाहतूक करणाऱ्या वाहनांकडे पुणेकरांचा कल वाढला आहे. त्यानुसार अनुक्रमे ९८ आणि २७२ वाहने मागील वर्षापेक्षा जास्त खरेदी करण्यात आले आहेत.
>
> **- स्वप्नील भोसले, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे.**

दरवर्षी गुढी पाडवा, अक्षय्य तृतीया, दसरा हे तीन आणि दिवाळी पाडवा अर्ध महुर्त अशा साडेतीन मुहूर्तावर गृह, सोने किंवा वाहन खरेदी केली जाते. प्रत्येकाला एकाच मुहूर्तावर खरेदी करायची असल्याने बाजारात उत्पादक कंपन्यांकडूनही आगाऊ आरक्षण करून घेण्यात येते. त्यानुसार यंदा वाहन खरेदीकडे नागरिकांचा कल वाढला असल्याचे दिसून येते. यंदाच्या वर्षी देखील वाहन खरेदी वाढ होत असून यंदा विक्रमी वाहन खरेदी झाली आहे.

पाडव्याचा मुहूर्त आणि वाहनांची प्रतीक्षा यामुळे खरेदीदारांनी महिनाभरापूर्वीच वाहनांची नोंदणी करून ठेवली. त्यानुसार वाहन खरेदीची प्रक्रिया निश्चित केल्यानंतर आरटीओ'तून नोंदणी क्रमांक आणि इतर कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी वाहन विक्री केंद्रांतून पाठविलेल्या अर्जानुसार १० हजार १७० कागदपत्रांची पूर्तता करण्यात आली आहे, असे आरटीओ प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले. मागील दोन वर्षांच्या (२०२३ आणि २०२४) तुलनेत वाहन खरेदीकडे नागरिकांचा कल वाढला असल्याचे आरटीओ प्रशासनाकडून सांगण्यात आले.

विशेषत: पर्यावरणपूरक आणि कमी खर्चीक असलेल्या इलेक्ट्रीक, सीएनजी तसेच एमएनजीएल अशी वेगवेगळी वाहने असून निरनिराळ्या उत्पादक कंपन्यांनी पर्याय उपलब्ध करून दिल्याने आपसूकच नागरिकांचा कल अशा वाहनांकडे कल वाढला आहे. त्यामुळे वाहनखरेदीला चालना मिळत ग्राया वाहनांना पसंती दिल्याचे आरटीओ प्रशासनाकडून सांगण्यात आले.

# दुर्गा टेकडीवर 'मानवी साखळी'

## नदी विकास प्रकल्पाला विरोध करत वेधले प्रशासनाचे लक्ष : आंदोलनात 250 हून अधिक नागरिकांचा सहभाग

**पिंपरी | प्रतिनिधी**

दुर्गा टेकडीवरील निसर्गसंपन्न जागांचे संरक्षण आणि पर्यावरणाच्या ऱ्हासास प्रतिबंध घालण्यासाठी जागरूक नागरिकांनी एकत्र येत 'मानवी साखळी' तयार केली. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या नदी विकास प्रकल्पासह इतर पुनर्विकास योजनांचा निषेध करण्यासाठी हा अनोखा उपक्रम राबवण्यात आला. 'रिव्हर कन्झर्वेशन २.०' आणि 'दुर्गा टेकडी मिशन' यांच्या संयुक्त विद्यमाने या आंदोलनाचे आयोजन करण्यात आले.




या आंदोलनात २५० हून अधिक नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. सकाळी व्यायामासाठी आलेल्या नागरिकांनीही या उपक्रमाला पाठिंबा दिला. त्यांनी पर्यावरण रक्षणाचे संदेश असलेले फलक हातात घेतले आणि समाजमाध्यमांवर छायाचित्रे शेअर करून जनजागृती केली. प्रस्तावित जलकुंभ आणि इतर विकासकामांमुळे दुर्गा टेकडीवरील निसर्गसंपत्ती धोक्यात येणार असल्याचा विरोध नागरिकांनी व्यक्त केला. झाडे तोड थांबवा', 'नद्यांना आधी स्वच्छ करा, 'करा नद्यांचे जतन, नाही तर खुर्च्या खाली करा' अशा घोषणा देत नागरिकांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. पवना, मुळा आणि इंद्रायणी नद्यांचे संरक्षण करण्यासाठी नागरिकांनी एकजूट दाखवली.

पर्यावरणप्रेमींनी, जबाबदार नागरिकांनी निसर्गस्नेही विकासावर भर देण्याची गरज अधोरेखित केली. नद्यांवरील कृत्रिम बंधारे, जलतट सौंदर्यीकरण आणि जैवविविधतेला धोका पोहोचवणाऱ्या प्रकल्पांचा विरोध करण्यात आला. स्थानिक स्वयंसेवी संस्था, सामाजिक संघटना आणि वैज्ञानिक तज्ज्ञांनीही या आंदोलनाला पाठिंबा दिला.

शहरात विविध भागांत हे आंदोलन पोहोचवण्यासाठी मोहिम राबवण्यात येणार आहे. पिंपरी-चिंचवडमधील नद्या अनेक वर्षांपासून प्रदूषण आणि दुर्लक्षाचा सामना करत आहेत. विविध स्तरांतून सातत्याने मागणी असूनही ठोस उपाययोजना होत नाहीत. नद्या केवळ जलस्रोत नसून त्यांचे सांस्कृतिक आणि ऐतिहासिक महत्त्वदेखील आहे, हे नागरिकांनी अधोरेखित केले.

**शहरभर आंदोलन**

९ मार्च: चिंचवड, चापेकर चौक
१५ मार्च: बालेवाडी
२३ मार्च: पिंपळे सौदागर
२९ मार्च: दुर्गा टेकडी
आगामी टप्पे: संपूर्ण शहरभर जनजागृती मोहिम

### राजकीय पातळीवरही निषेध

» महाराष्ट्र विधान परिषद सदस्य अमित गोरखे यांनी विधानसभेत प्रवेश करत या प्रकल्पांविरोधात निषेध नोंदवला. 'नद्यांचे उपचार करा, सौंदर्यीकरण नव्हे, 'नदीसुधार अंतर्गत वृक्षतोड थांबवा' असे फलक हातात धरून त्यांनी पर्यावरण संरक्षणाचा संदेश दिला.

### अकरा वर्षीय प्रज्ञेशचा भावनिक संदेश


» ११ वर्षीय प्रज्ञेश चिंचवडे याने आपली भावना मांडली. माझ्या आजोबांनी सांगितले होते की, पूर्वी नदीमध्ये पोहायला जाता यायचे. पण आता पाणी इतके खराब झाले आहे की पोहणे शक्य नाही. कोविडच्या काळात आम्ही नदीकिनारी जात होतो, पण आता तिथे परत घाण वाढली आहे. झाडतोड थांबली असती, तर पक्षी आणि प्राणी दिसले असते; पण आता ते दिसत नाहीत. जर झाडतोड थांबली नाही आणि प्राण्यांचे घर नष्ट झाले, तर ते कुठे जातील? त्यांनाही त्यांच्या घराचा हक्क आहे. आपण निसर्ग आणि नैसर्गिक ठिकाणांचे रक्षण केलेच पाहिजे.

# प्रदूषणमुक्तीसाठी राज्य सरकार कटिबद्ध

## संवाद बैठकीत महापालिका, पीएमआरडीए, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाचा सहभाग

**पिंपरी | प्रतिनिधी**

पवना आणि इंद्रायणी नदीला प्रदुषणाच्या विळख्यातून सोडवण्यासाठी राज्य शासनाने कंबर कसली आहे. त्यासाठी जादाचे सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) उभारणी करण्याबाबतचा आढावा राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाकडून घेण्यात आला. त्याअनुषंगाने पर्यावरण विभागाच्या सचिवांच्या उपस्थितीत व्हीडिओ कॉन्फरन्सद्वारे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.



या बैठकीत पिंपरी-चिंचवड महापालिका, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) आणि महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण महामंडळाचे अधिकारी सहभागी झाले होते. या वेळी तीनही कार्यालयाकडून प्रकल्पाबाबतची सद्यस्थिती ची माहिती घेण्यात आली. पवना आणि इंद्रायणी नदी प्रदुषणाच्या विळख्यात सापडल्याने शहरवासीयांचे आरोग्य धोक्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाला जाग आल्याचे दिसत आहे. या संवाद बैठकीच्या बैठकीचे माध्यमातून पवना नदी काठावर उभारण्यात येत असलेले एसटीपी प्रकल्पाचा आढावा घेण्यात आला.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या पर्यावरण विभागाकडून सध्या तीन ठिकाणी एसटीपी प्रकल्प उभारण्यात आले आहेत. त्याची ट्रायल रन घेण्यात येणार आहे. चिखली, बोपखेल आणि पिंपळे निलख या ठिकाणी हे प्रकल्प उभारले जाणार आहेत. तसेच उर्वरीत १०५ एमएलडीचे एसटीपी प्रकल्प ताथवडे, मामुर्डी, किवळे आदीसह विविध ठिकाणी हे प्रकल्प उभारले जाणार आहेत. त्याची माहिती महापालिकेच्या वतीने देण्यात दिली.

> “ पीएमआरडीए पवना नदीपात्रालगत १५ प्रकल्प उभारणार आहे. त्याचा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठवण्यात आला आहे. अद्याप त्याला मंजुरी मिळाली नाही. त्याचा आढावा या बैठकीत मांडण्यात आला.
>
> **- अनिता कुलकर्णी, कार्यकारी अभियंता, पीएमआरडीए**

# पुणे-दौंड मार्गावरील 'डेमू' मुळे प्रचंड नुकसान

## दौंड आणि परिसरातून नोकरी, व्यवसाय, शिक्षणानिमित्त दैनंदीन येणाऱ्यांची संख्या जास्त



**पुणे | प्रतिनिधी**

पुणे दौंड पुणे मार्गावरून धावणाऱ्या डेमू जुन्या झाल्या असून वारंवार बंद पडण्याच्या घटना होत आहेत. त्यामुळे दैनंदीन प्रवाशांना नियोजित ठिकाणी वेळेवर पोहचण्यास विलंब होत असल्याने मनस्ताप होत आहे. त्यामुळे पुणे-दौंड हे उपनगरीय क्षेत्र घोषित करून लोकल सेवा करावी अशी मागणी ग्रामीण रेल्वे प्रवासी संघटनेकडून करण्यात आली आहे. दरम्यान, तातडीने सेवा सुरु करण्यात आली नाही, तर बुधवारपासून (५ मार्च) दौंड रेल्वे स्थानकावर चक्का जाम आंदोलन करण्यात येईल, असा इशारा यावेळी देण्यात आला आहे.

दौंड आणि परिसरातून नोकरी, व्यवसाय, शिक्षणानिमित्त दैनंदीन येणाऱ्यांची संख्या जास्त आहे. विशेषतः रेल्वेने प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या जास्त आहे. दौंड, पाटस, केडगांव, खुटबाव, यवत, उरुळी, लोणी, मांजरी, हडपसर हे पुण्याच्या अगदी जवळ या ठिकाणावरून उद्योग आणि कार्यालयांच्या ठिकाणी तसेच शिक्षणासाठी विद्यार्थी येत असतात. हडपसर-मगरपट्टा येथे असणारे माहिती तंत्रज्ञान (आयटी) केंद्र, रुग्णालये, औद्योगिक कंपन्या, मांजरी येथे सिरम इन्स्टिट्यूट, लोणी येथे एमआयटी कॅम्पस, उरुळी येथील प्रयागधाम, यवत येथे गुळा उत्पादक कारखाने, कुरकुंभ औद्योगिक वसाहत, दौंड नगरपालिका आदी मोठमोठ्या ठिकाणी येणाऱ्या जाणाऱ्यांची संख्या जास्त आहे. या मार्गावर दैनंदीन प्रवास करणाऱ्यांसाठी 'डेमू' सुविधा आहे.

मात्र ही 'डेमू' व्यवस्थित चालत नसून अचानक निर्माण होणारे तांत्रिक बिघाड, लांब पल्ल्याच्या गाड्या आल्यावर अचानक बाजुला उभी करावी लागल्याने होणारा विलंब, वारंवार डेमू बंद पडण्याचे प्रकार सतत घडत आहे. त्यामुळे नोकरदारांना याचा मोठा फटका बसत असून व्यवसायांवरही परिणाम होत आहे. विशेषतः या मार्गावरून मोठ्या प्रमाणात दुधाची वाहतूक केली जाते. विलंब झाल्याने दुध उत्पादकांना फटका बसत असून त्यामुळे पुणे ते दौंड हे उपनगरीय क्षेत्र घोषित करून लोकल सेवा सुरु करावी, अशी मागणी गेल्या अनेक वर्षांपासून करण्यात येत आहे. अद्याप याबाबत कुठलीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, असे प्रवाशांकडून सांगण्यात आले.

### 74 किमीसाठी अडीच तास

» पुणे ते दौंड हे रेल्वे अंतर ७४ किलोमीटर आहे. पुणे आणि दौंड मार्गादरम्यान लोणी, उरुळी, केडगाव हे तीन थांबे असून सव्वा तासाचा कालावधी लागतो. मात्र, तांत्रिक बिघाड किंवा इतर रेल्वेमुळे डेमू थांबविण्यात येत असल्याने दीड ते दोन तासांचा विलंब होत असून नियोजित ठिकाणी जाण्यास अतिरिक्त वेळ लागत आहे. त्यामुळे उद्योग आस्थापनातील कर्मचाऱ्यांच्या नोकऱ्यांवर परिणाम होत आहे.

" पुणे-दौंड मार्गावरील जुनी डेमू बंद करून लोकल सेवा सुरु करावी अशी मागणी गेल्या अनेक वर्षांपासून करण्यात येत आहे. मात्र, अद्याप कुठलीच कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे तातडीने कार्यवाही करण्याबाबत रेल्वे प्रशासनाला निवेदन देण्यात आले आहे. पुढील पाच दिवसात कुठलीच कार्यवाही झाली नाही, तर दौंड स्थानकावर तीव्र आंदोलन करण्यात येईल.

- सारिका भुजबळ, अध्यक्ष, पुणे ग्रामीण रेल्वे प्रवासी संघ.

# कोथरूडमधील पाणीप्रश्नासंदर्भात मंत्री चंद्रकांत पाटील आक्रमक

## वस्तुनिष्ठ अहवाल साधर करण्याचे मंत्री चंद्रकांत पाटील यांचे महापालिकेला आदेश



**पुणे | प्रतिनिधी**

कोथरूड मधील रस्ते आणि पाणी प्रश्नासंदर्भात राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. यासंदर्भात महापालिकेच्या पाणीपुरवठा आणि पथ विभागाने तातडीने वस्तुनिष्ठ अहवाल सादर करावा, अशी सूचना त्यांनी केली असून अहवालाच्या आधारे पुढील आठवड्यात बैठक घेण्यात येणार आहे. कोथरूड मतदारसंघातील पाणी आणि रस्त्यांच्या समस्येसंदर्भात चंद्रकांत पाटील यांच्या निवासस्थानी बैठक झाली.

मालमत्ता विभागाचे अतिरिक्त आयुक्त महेश पाटील, पाणीपुरवठा विभागाचे नंदकुमार जगताप, भवन विभागाचे अधीक्षक अभियंता युवराज देशमुख, महसूल विभागाचे विशेष कार्य अधिकारी राजेंद्र मुठे, विलास भालेराव यांच्यासह दक्षिण कोथरूडचे मंडल अध्यक्ष डॉ. संदीप बुटाला, शहर सरचिटणीस पुनीत जोशी, गणेश कळमकर, माजी नगरसेवक दीपक पोटे उपस्थित होते.

कोथरुड मधील पाणीपुरवठ्यातील अडचणींची माहिती पाटील यांनी घेतली. यात प्रामुख्याने उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर वस्ती आणि सोसायटी भागात समान पाणीपुरवठा व्हावा; यासाठी महापालिकेच्या उपाययोजनांचा आढावा घेतला. कोथरुड मधील वस्ती भाग हा अनेक ठिकाणी चढावर वसलेला असल्याने उन्हाळ्यात पाणीपुरवठा करताना मर्यादा येत असल्याची बाब अधिकाऱ्यांनी निदर्शनास आणून दिली. यामध्ये प्रामुख्याने सुतारदरा, किष्किंधा नगर, केळेवाडी भागातील पाणीपुरवठ्यावर परिणाम होत असल्याचे सांगण्यात आले. त्यावर उपाय म्हणून लोकसहभागातून वस्ती भागाच्या सुरुवातीला पाण्याच्या टाक्या उपलब्ध करुन देण्यात येतील. तसेच या टाक्यांमध्ये महापालिकेने पाणी उपलब्ध करुन द्यावे, अशी सूचना पाटील यांनी केली.

विकास आराखड्यातील रस्त्यांबाबतही बैठकीत चर्चा झाली. परांजपे शाळेसमोरील डीपी रस्त्यामधील एक रहिवासी न्यायालयात गेल्याने रस्त्याची कामे रखडल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होत असल्याचा दावा पथ विभागाकडून करण्यात आला. हा रस्ता नागरिकांच्या सुविधेसाठी आवश्यक असल्याने महापालिकेने न्यायालयात प्रभावी बाजू मांडावी, अशी सूचना पाटील यांनी केली. चांदणी चौकातील मुख्य महामार्गालगत एकलव्य महाविद्यालय येथून जाणाऱ्या १५ मीटरच्या रस्त्याचा प्रश्न अद्याप का प्रलंबित आहे, अशी विचारणा पाटील यांनी अधिकाऱ्यांकडे केली.

### नाट्यगृहाबाबत सूचना

» बाणेर बालेवाडी भागातील नागरिकांकडून नाट्यगृह उभारण्याची मागणी सातत्याने होत आहे. तसेच कोथरुड मध्येही शास्त्रीय नृत्यासह इतर सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी संकुल उभारण्याची मागणी स्थानिक नागरीक तथा कलाप्रेमींकडून होत आहे. दोन्ही मागण्यांच्या अनुषंगाने जागा आणि नाट्यगृह किंवा संकुल उभारण्यासाठी अपेक्षित खर्च आदींवर अभ्यास करून अहवाल करण्याची सूचना चंद्रकांत पाटील यांनी केली.